**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ
अकोला

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 10-03-2023**

**बुलढाणा(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2023-03-10 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2023-03-11 | 2023-03-12 | 2023-03-13 | 2023-03-14 | 2023-03-15 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 33.8 | 34.4 | 35.1 | 35.3 | 35.5 |
| किमान तापमान (अं.से) | 18.1 | 18.5 | 18.9 | 19.4 | 19.3 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 47 | 46 | 44 | 48 | 49 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 37 | 36 | 34 | 38 | 39 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 5.0 | 5.0 | 5.0 | 5.0 | 5.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 53 | 83 | 116 | 90 | 92 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 3 | 3 | 3 | 4 | 4 |

## हवामान सारांश / चेतावणी:

भारतीय हवामान खात्याने आज वर्तविलेल्या पाच दिवसीय हवामान अंदाजानुसार बुलढाणा जिल्ह्यात येत्या पाच दिवसात कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे.

## कृषि सल्ला:

रब्बी पीकांच्या काढणीनंतर शेतजमीन खोलवर नांगरून घ्यावी जेणेकरून मातीतील किडींच्या अवस्था व मातीद्वारे होणाऱ्या रोगांचा प्रतिबंध होण्यास मदत होईल.जमिनीची खोल नांगरणी केल्यास जमिनीत पाणी खोलवर जिरते व त्यामुळे जमिनीतील ओल टिकून राहते.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

उन्हाळ्यात भूजल पातळी खालावते म्हणून शेतकऱ्यांनी पिकांना ओलीत करतेवेळी पाण्याचा अपव्यय होणार नाही अशा पद्धतीने पाणी द्यावे.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हरभरा | परिपक्व झालेल्या हरभरा पिकाची कापणी (दाण्यातील ओलावा ११-१२ % असताना) करून मळणी करून घ्यावी. मळणी करून तयार झालेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करण्यापूर्वी त्याला उन्हात वाळवावे. |
| भुईमूग | सध्याचे हवामान उन्हाळी भुईमुंग पिकावर फुलकिड्यांचा प्रादुर्भाव होण्यास पोषक आहे.त्याच्या नियंत्रणासाठी ५० मिली ईमिडाक्लोप्रिड २०० लिटर पाण्यात मिसळून प्रती एकर याप्रमाणे फवारणी करावी. |
| सूर्यफूल | सध्याची तापमान कक्षा लक्षात घेता उगवणपश्चात अवस्थेमध्ये सुर्यफुल पिकाला पाण्याचा ताण बसणार नाही याची काळजी घ्यावी. पिक ४५ दिवसांचे होईपर्यंत आंतरमशागत करून तणमुक्त ठेवावे. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| गहू | वेळेवर पेरणी केलेल्या गहू पिकाची परीपक्वतेनुसार काढणी शक्यतो सकाळच्या वेळेत करावी.काढणी केलेल्या पिकाची मळणी करून तयार झालेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.यावेळी पक्षांद्वारे धान्याचा ऱ्हास होणार नाही याची दक्षता घ्यावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| वांगे | सध्याच्या हवामानात वांगी पिकावरील रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्काची किंवा फिप्रोनील २५ मिली / १० ली. पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मिरची | हवामानाच्या सध्याच्या परिस्थितीमुळे मिरची पिकामध्ये रसशोषक किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही,त्याकरिता उपाय म्हणून शेतकऱ्यांनी ईमीडाक्लोप्रिड १७.८ एस.एल. ५.० मिली/१० ली. पाणी किंवा डायमेथीओएट ३० % प्रवाही १.० मिली/ ली. पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| संत्रा | मृग बहारातील संत्रा फळाचा आकार वाढविण्यासाठी पोटॅशीयम नायट्रेट १.५ किलो / १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| कांदा | कांदा पिकामध्ये मर/पानांवरील चट्टे या बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यू.पी.२५ ग्रॅम + सॅन्डोव्हीट स्टीकर ५० मिली/१० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टरबूज | कलिंगड या पिकांतील नागअळीच्या नियंत्रणासाठी प्रोफेनोफॉस २० मिली / १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरा किंवा बकरी | शेळ्यामधील पोटफुगी या आजाराचे व्यवस्थापन करण्यासाठी आजारग्रस्त शेळीला ओवा,धने,जिरे व काळे मीठ टाकून साधारणत: १५ ते २० ग्रॅम या मात्रेत द्यावे. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| माती चाचणी | शेतकऱ्यांनी माती परीक्षणासाठी पिकाच्या काढणीनंतर व नांगरणीच्या अगोदर मातीचा नमुना घ्यावा.माती परीक्षण अहवालानुसार शेतकऱ्यांना योग्य खत व्यवस्थापन करून चांगले उत्पादन घेता येते. |